आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर २०२५

ठळक बातम्या

1. महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे आलेल्या संकटकाळात केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं मोदी यांचं फडणवीस यांना आश्वासन.

2. सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार मदत करावी अशी काँग्रेसनेते विजय वडेट्टीवार यांची कृषी मंत्र्यांना पत्राद्वारे मागणी.

3. राज्यातील पूरपरिस्थितीच्या पार्शवभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संयुक्त पूर्व परीक्षा २८ सप्टेंबर ऐवजी ०९ नोव्हेंबरला होणार.

4. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मालिकेतला तिसरा सामना, भारत आणि श्रीलंकेदरम्यान.

5. गडचिरोली जिल्ह्यातील पर्लकोटा नदीला पाचव्यांदा पूर, भामरागड तालुक्यातील ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी/ फडणवीस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली आणि त्यांना महाराष्ट्रातील पाऊस, पूरस्थिती आणि त्यातून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती दिली. केंद्र सरकार कडून भरीव मदतीसाठी एक निवेदनही त्यांना सादर केलं. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठिशी आम्ही खंबीरपणे उभे राहू, अस आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिलं. याशिवाय, महाराष्ट्रातील संरक्षण कॉरिडॉर, गडचिरोलीतील पोलाद उत्पादनासाठी सवलती, दहीसर येथील भारतीय विमानतळ प्राधीकरणाच्या जागेचे हस्तांतरण तसच ईज ऑफ डुईंग बिझनेसच्या दृष्टीन महाराष्ट्र सरकार करीत असलेले उपाय इत्यादींबाबत सविस्तर चर्चा मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांशी केली.

*माननीय प्रधानमंत्री महोदयांना एक निवेदन मी दिलेलं आहे. त्यांनी देखील त्याला सकारात्मकता दाखवली आणि त्यांनी सांगितलं की लवकरात लवकर तुमचा प्रस्ताव येऊ द्या, तो प्रस्तावाला की आम्ही त्याच्यावर कारवाई करू आणि जेवढी जास्तीत जास्त मदत करता येईल मदत करण्याचं आश्वासन देखील माननीय प्रधानमंत्री महोदयांनी त्या ठिकाणी दिलेला आहे.*

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या 8 आणि 9 ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार आहे, अशी माहितीही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

<u>वडेट्टीवार</u>

विदर्भात सोयाबीनच्या पिकाला हमीभाव मिळत नसल्याचा प्रश्न ताजा असतानाच 'येलो मोझॅक' या रोगामुळे शेतकऱ्यांच्या हातात आलेलं पीक देखील उद्धवस्त झालेलं आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार मदत सरकारन करावी. अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी केली. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील बेलोना गावातील शेतात आज काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी पाहणी केली. येलो मोझॅक या रोगाचा प्रादुर्भाव यवतमाळ, वाशिम, वर्धा, चंद्रपूर अशा अनेक जिल्ह्यात झाला आहे.यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण हंगामाचे नुकसान होणार आहे. याबाबत पाहणी करून शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी कृषिमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे.

<u>चंद्रशेखर बावनकुळे</u>

राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या गाडीला अमरावती मधील पंचवटी चौकात अडथळा आणण्याचा प्रयत्न काँग्रेस कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. या प्रकारावर अमरावतीचे पालकमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संताप व्यक्त केला आहे.

<u>नितीन गडकरी</u>

संत्रा ही विदर्भाची शान असून त्याचा दर्जा अधिक चांगला करून जागतिक बाजारपेठेत निर्यात योग्य बनवण्यासाठी नर्सरी सक्षम करण आवश्यक आहे. या दृष्टीन राज्य आणि केंद्र शासनाच्या कृषी धोरणात आवश्यक सुधारणा करण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय कृषी आणि फलोत्पादन मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्याशी चर्चा करणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. 'उत्तम नर्सरीचे नियोजन आणि संत्रा उत्पादकांसाठी सुधारित धोरण' या विषयावर आयोजित बैठकीत गडकरी बोलत होते.

<u>मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस</u>

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायांच्या कृषी तसच वन-आधारित उपजीविकेला चालना देण्यासाठी मुख्य रस्त्यालगत लहान गोदाम उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. अन्न-धान्य आणि लघु वनोपज साठवणुकीसाठी उभारण्यात

येणाऱ्या या गोदामांसाठी 'नाबार्ड' कडून पायाभूत विकास निधी आणि औपचारिक भागीदारीतून सहकार्य मिळालं असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. अन्न आणि नागरी पुरवठा विभाग, नोडल तर, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त झाले आहेत. या कामांसाठी शासनान ग्रामीण पायाभूत विकास निधीतून २ हजार ११५ कोटी रुपये तरतूद केली असून, त्यात यावर्षी ९२० कोटींची वाढ करण्यात आली आहे.

सेवापर्व

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवापर्व निमित्तच्या विशेष मालिकेच्या आजच्या भागात सरकार ई-शासन परिसंस्थेद्वारे प्रशासनाला एका सलग, पारदर्शी आणि समावेशक डिजिटल पद्धतीत रुपांतरीत करत असलेल्या प्रयत्नांविषयी जाणून घेऊ...

*"सार्वजनिक सेवांपासून ते आर्थिक सक्षमीकरणापर्यंत, देशाची ई-शासन परिसंस्था नागरिकांच्या सुविधांची पुनर्परिभाषाकरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनातून सरकार तंत्रज्ञानाधारीत प्रशासनअधिक सुलभ आणि सर्व समावेशक करत आहे. पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे, ई-शासन सुलभ, प्रभावी, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक आहे.*

*मेरे हिसाब से ई-गवर्नेंस, इजी गवर्नेंस, इफेक्टिव गवर्नेंस, इकॉनॉमिकल गवर्नेंस, एनवायरनमेंट फ्रेंडली गवर्नेंस।*

*(जन धन, आधार आणि मोबाइल अर्थात जेएमएम देशाच्या सुविकसित डिजिटल संरचनेचे प्रमुख घटक ठरले. थेट लाभ हस्तांतरण, सरकारी लाभ, अनुदान आणि देयके थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी जेएएम नेटवर्कचा वापर केला जातो. तर, दुसरीकडं ई-केवायसी आधार-आधारित पडताळणी जलद, कागदविरहित आणि फसवणुकीपासून सुटका करणारी ठरत आहे. सरकारी ई-मार्केटप्लेस-जीईएमन खरेदीमध्ये क्रांती घडवून आणली आहे. यातून लाखो लघु व्यवसायीक, महिला उद्योजक आणि स्टार्टअप्सना सक्षम केलं जात आहे.तंत्रज्ञान आता सरकार आणि नागरिकांमधील सेतू ठरले आहे. देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत डिजिटल, समावेशक आणि पारदर्शकपणे प्रशासन पोहचत आहे.)*

## एमपीएससी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगान राज्यातील पूरजन्य परिस्थिती आणि हवामान खात्याच्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे २८ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलल्याचं जाहीर केलं आहे. सुधारित दिनांकानुसार ही परीक्षा आता ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येईल. राज्य सरकारच्या विनंती नंतर आणि विविध जिल्ह्यांतील परीक्षार्थ्यांच्या मागण्यांचा विचार करत आयोगानं हा निर्णय घेतला. यामुळे, परीक्षार्थींना परीक्षेसंबंधी कोणताही अडथळा येणार नाही. पूर्वनियोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ चा सुधारित दिनांक शुद्धि पत्रकाद्वारे स्वतंत्रपणे जाहीर केला जाईल. असं आयोगानं कळवलं आहे.

## ११वे शिक्षक साहित्य संमेलन अकोल्यात

शिक्षकांच्या साहित्य प्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि भाषा-साहित्याच अध्यापन आशय समृद्धीसाठी होणारे राज्यव्यापी शिक्षक साहित्य संमेलन यावर्षी अकोला इथं दिनांक १४ डिसेंबर रोजी होणार आहे. संमेलनाचं हे ११वं वर्ष असून संमेलनाध्यक्ष म्हणून कवी, प्राध्यापक डॉ.दासू वैद्य यांची निवड करण्यात आली आहे. यासंदर्भात आकाशवाणीशी बोलताना दासू वैद्य म्हणाले ........

*शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी जेव्हा निवड होते तेव्हा ती जबाबदारी दुहेरी असते. कारण शिक्षक म्हणल्यानंतर त्याची एक स्वतंत्र जबाबदारी आणि पुन्हा साहित्यिक असं म्हणल्यानंतर त्याची दुसरी जबाबदारी तुम्हाला असं वाटतं की शिक्षक ज्या पद्धतीने आजची तरुणाई आहे किंवा या सगळ्या प्राथमिक वर्गापासून ज्या पद्धतीने एक पिढी घडवत असतो आणि त्याच्या जवळ जर साहित्याची गोष्ट असेल किंवा साहित्याचा आयाम असेल तर त्याचं अध्यापन अध्यायानच नाही तर तो जे काही देतो ते जास्त प्रभाव पडणार असते.*

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख असेलेले दासू वैद्य हे १९९० नंतरच्या पिढीचे महत्त्वाचे कवी आहेत. कविता, ललितलेख, एकांकिका, बालसाहित्य, नभोनाट्य, स्तंभलेखन, गीतलेखन अशा विविध प्रकारातून त्यांनी विपुल लेखन केलं आहे.

आशिया चषक

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सुपर फोर मध्ये आज भारताचा सामना श्रीलंकेसोबत होणार आहे. दुबई इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. भारत या आधीच अंतिम फेरीत दाखल झाला असून, श्रीलंकेचा संघ स्पर्धेच्या बाहेर गेला आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना येत्या रविवारी भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणार आहे. तत्पूर्वी दुबईमध्ये खेळल्या गेलेल्या आशिया कपच्या सुपर-4 सामन्यात पाकिस्तानन बांगलादेशवर 11 धावांनी विजय मिळवून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. बांगलादेश विरुद्धच्या सामन्यातील विजयानंतर पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघा यान भारताला आव्हान दिलं असून त्यांचा संघ कुणालाही हरवू शकतो, असा विश्वास व्यक्त केला आहे. रविवारच्या सामन्यात आमचा संघ पूर्ण ताकदीनिशी उतरेल असही आघा म्हणाला.

हवामान

गडचिरोली जिल्ह्यालगत असलेल्या छत्तीसगड राज्यात मुसळधार पाऊस पडल्यान भामरागड नजीकच्या पर्लकोटा नदीला पूर आला असून, पुरामुळे त्या भागातील ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. आज सकाळी ६ वाजता पासून पर्लकोटा नदीला पूर आला असून, जुन्या पुलावरुन पुराचे पाणी वाहू लागल्यान भामरागड-आलापल्ली मार्ग बंद झाला आहे. मागील चोवीस तासात सिरोंचा तालुक्यात सर्वाधिक ६९ पूर्णांक ६ मिलिमीटर पाऊस पडला. आज दुपारी गडचिरोली शहरासह काही भागात प्रचंड मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अर्धा तास पावसान हजेरी लावली. आताच हाती आलेल्या बातमीनुसार पर्लकोटा नदीच्या पुलावरील पाणी ओसरल्याने वाहतूक पूर्ववत होत आहे.

*****